# दरवर्षी पाच शेतकऱ्यांना कृषी पुरस्काराने सन्मानित करा

## आ. संजय खोडके, दोन उत्कृष्ट महिला शेतकरी, क्रीडापटू व विद्यार्थ्यांचा सत्कार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 22)** श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या 'डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार 2024' ने केंद्रीय दळणवळण व रस्ते वाहतूक मंत्री ना.नितीनजी गडकरी यांना सन्मानित करण्यात आले.रु.पाच लक्ष रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन संस्थेचे अध्यक्ष व पदाधिकारी यांनी त्यांना सन्मानित केले. संस्थेच्या या पाच लक्ष रुपयाच्या पुरस्कारात स्वत:च्या 20 लक्ष रुपयांची भर घालून होणाऱ्या 25 लक्ष रुपयात संस्थेतर्फे दरवर्षी पाच शेतकऱ्यांना कृषी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात यावे, असे ना.गडकरी यांनी यावेळी जाहीर केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा 22 मार्च रोजी पार पडला. संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन प्र. देशमुख यांच्या अध्यक्षतेत आयोजित या सोहळ्याला केंद्रीय दळणवळण व रस्ते वाहतूक मंत्री ना.नितीनजी गडकरी मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते तर मा.खासदार शरदचंद्र पवार हे प्रमुख अतिथी म्हणून आभासी पद्धतीने उपस्थित होते.राज्यसभा सदस्य खा.डॉ.अनिल बोंडे, अमरावतीचे खासदार बळवंतराव वानखडे आणि अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके, आमदार संजय खोडके, माजी मंत्री प्रवीण पोटे, कमल गवई हे या सोहळ्याला अतिथी म्हणून उपस्थित होते. या सोहळ्यात खासदार शरदचंद्र पवार यांनी दिलेल्या दानिनिधीतून पातुर तालुक्यातील वंदना देविदास धोत्रे या विदर्भातील उत्कृष्ट शेतकरी महिलेला 'शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार 2024' देऊन सन्मानित करण्यात आले. रोख एक लक्ष अकरा हजार एकशे अकरा, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, केंद्र सरकारने डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या 125 व्या जयंती प्रीत्यर्थ प्रसारित केलेले 125 रुपयांचे नाणे, साडी, चोळी, शाल व श्रीफळ असे शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्काराचे स्वरूप होते. आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीनेभंडारा जिल्ह्यातील महालगाव येथील वंदना राधेश्याम वैद्य यांना 'श्रीमती विमलाबाई देशमुख शेतीनिष्ठ महिला शेतकरी पुरस्कार 2024' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले 51



### ना.नितीन गडकरी डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्काराने सन्मानित

हजार रोख, स्मृतिचिन्ह, साडी,चोळी, शाल व श्रीफळ असे 'श्रीमती विमलाबाई देशमुख शेतीनिष्ठ महिला शेतकरी पुरस्काराचे स्वरूप होते. नवनियुक्त विधान परिषद सदस्य आ.संजय खोडके यांचा संस्थेच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळ्याचे प्रास्ताविक व अध्यक्षीय भाषण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी केले तर कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी आभार मानले.पुरस्कार वितरण सोहळ्याचे संचालन डॉ.वर्षा चिखले व डॉ.मनीष गायकवाड यांनी केले. डॉ.किशोर फुले यांनी ना.गडकरी यांना दिलेल्या मानपत्राचे वाचन केले.डॉ.राजेश उमाळे यांच्या नेतृत्वात सांगळूदकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत व गौरव गीत सादर केले. पुरस्कार वितरण सोहळ्याला संस्थेचे उपाध्यक्ष सर्व श्री.ॲड.गजाननराव पुंडकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य सर्व हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, प्रा.सुभाषराव बनसोड, संस्थेचे सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, नरेशचंद्र पाटील, डॉ.पी.एस.वायाळ, डॉ.अमोल महल्ले हे प्रामुख्याने उपस्थित होते. सोहळ्याला आभासी पद्धतीने उपस्थित राहिलेले राष्ट्रीय नेते शरदचंद्र पवार यांनी ना.गडकरी यांच्या कार्याची प्रशंसा केली.

### या विद्यार्थ्यांचा सत्कार

वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु.मिथिला भालचंद्र कवीश्वर व संस्कृती शैलेश राठोड यांना श्रीमती विमलाबाई देशमुख (वैद्यकीय शिक्षण) अभ्यासवृत्ती प्रदान करण्यात आली तर कृषी शाखेच्या विद्यार्थिनी वैष्णवी आदिनाथ मानवटकर आणि वैष्णवी किसान कदम, समीक्षा दिलीप नागापुरे, धनश्री गजानन मुळे यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले (कृषी शिक्षण) अभ्यासवृत्ती देण्यात आली. आणि माध्यमिक शाळेतील खेळाडू विद्यार्थी सौम्य राजेंद्र राऊत व विद्यार्थिनी आयुषी धर्मेंद्र दिवाण क्रीडाक्षेत्रातील उल्लेखनीय प्राविण्याबद्धल ' डॉ.पंजाबराव देशमुख क्रीडारत्न पुरस्कार' देखील या सोहळ्यात प्रदान करण्यात आला. उत्तराखंड येथे झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत दोन सुवर्ण व एक रौप्य पदक प्राप्त करणाऱ्या दीप्ती आशिष काळमेघ हिला संस्थेतर्फे ती लक्ष रुपये देऊन सन्मानित करण्यात आले.

# आगीत शिवशाही बस भस्मसात

## चालक-वाहकासह बसमध्ये होते तीन प्रवासी

### माहुली चोरजवळील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 22)** नांदगाव खंडेश्वर हद्दीतील माहुली चोर गावाजवळ 22 मार्च रोजी दुपारी अमरावतीवरून यवतमाळकडे जाणारी शिवशाही बसला आग लागल्याने खळबळ उडाली होती. बसमध्ये चालक-महिला वाहकासह तीन प्रवाशी होते. सुदैवाने ते तत्काळ बसखाली उतरले. त्यामुळे जीवीतहानी टळली.

22 मार्च रोजी दुपारी 2.30 मिनीटांनी अमरावती आगाराची शिवशाही बस क्रमांक एम एच 06 बि डब्यु 0294 यवतमाळकडे भरधाव निघाली होती. दरम्यान नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील चोर माहुली गावाजवळ असताना, दुपारी 3.50 वाजताच्या सुमारास बसच्या बोनेटमधून धुर निघत असल्याचे बस चालक व्ही.पी.ढोलवाडे यांच्या लक्षात आले.

त्यामुळे त्यांनी तत्काळ बस रस्त्याचे कडेला उभी केली आणि त्यानंतर चालक ढोलवाडे, महिला वाहक पी.एस.अलाटकर व बसमधील तीन प्रवाश्यांना खाली उतरले. दरम्यान शिवशाही बसच्या आगीने रौद्ररुप धारण केले. त्यामुळे या घटनेची माहिती महामंडळाच्या वरिष्ठ अधिकार्यांना देण्यात आला. त्यानंतर बडनेरा येथील अग्निशमन दलाच्या चमू घटनास्थळी पोहोचला आणि त्यांनी बसची आग विझविण्याचे प्रयत्न केले.

परंतू तोपर्यंत शिवशाही बस पुर्णत जळून खाक झाली होती. केवळ लोखंडी वस्तुच शिल्लक होत्या. सुदैवाने या घटनेनंतर बस चालकाने प्रसंगावधाना राखल्याने जीवितहानी टळली.

# घरासमोर कार उभी केल्याने तलवारीने हल्ला

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 22) -** घरासमोर वाहन उभे कारणावरून झालेल्या वादानंतर एका इसमावर तलवारीने हल्ला करण्यात आला. ही घटना 21 मार्च रोजीच्या रात्री नूर नगर क्रमांक 2 मध्ये घडली होती. जखमी शेख शाहरुख शेख नजीर (28) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी नईमुद्दीन, नाझीमोदीन, निजामोदीन व एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शेख शाहरुख आपल्या कुटुंबासह नूर नगरमध्ये राहतो. त्यांच्याकडे टाटा एसी वाहन आहे. ते वाहन तो घरासमोर पार्क करते. या कारणावरून आरोपींनी 21 मार्च रोजी सायंकाळी 6.30 वाजता शेख शाहरुख हे त्यांचे तीन भाऊ शेख नाजीक, शेख ऐफाज आणि शेख नाजीम यांच्यासह नमाज अदा करून घराकडे येत असल्याचे पाहिले आणि त्यानंतर आरोपी नईमुद्दीन आणि नजीमोद्दीन यांनी शेख शाहरुखच्या वडिलांवर तलवार आणि पाईपने हल्ला केला. नईमुद्दीन तलवारीने वार करत असताना शेख शाहरुख आणि त्याच्या भावाने मध्यस्थी केली. दरम्यान आरोपींनी शिवीगाळ करून त्याच्यावर तलवारीने वार केले, येथे टाटा एसी लावू नका, असे सांगून निजामोदीन याने त्याच्यावर लोखंडी पाईपने वार केले. तसेच शेख ऐफाज यांच्यावरही तलवारीने व लोखंडी पाईपने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात शेख शाहरुखची आईही जखमी झाली आहे. याप्रकरणात शेख शाहरुखच्या फिर्यादीवरून नागपुरीगेट पोलिसांनी नईमुद्दीन, नाझीमोदीन, निजामोदीन व एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### जैन आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांचा दौरा

**अमरावती -** जैन आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी सोमवार, दि. 24 मार्च रोजी जिल्ह्याचा दौरा करणार आहेत. दौऱ्यानुसार, श्री. गांधी दुपारी 4.30 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आणि जिल्हा प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतील. सायंकाळी 5 वाजता नियोजन भवनात भगवान महावीर जन्म कल्याणक निबंध स्पर्धा प्रमाणपत्र वितरण आणि सकल जैन समाज प्रतिनिधींशी चर्चा करतील. सायंकाळी 6 वाजता व्यापारी, उद्योजक आणि संस्था संघटना पदाधिकाऱ्यांशी बैठक घेतील. सायंकाळी 7 वाजता गांधी चौक येथे जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या अमरावती जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन करतील.

# बालविवाहानंतर अल्पवयीन गर्भवती

### कुटुंबातील 9 जणांवर गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 22) -** राजस्थानमधील तरुणासोबत अल्पवयीन मुलीचा विवाह करणे एका कुटुंबाला महागात पडला आहे. प्रसूतीसाठी तिला रुग्णालयात दाखल केल्यानंतर हा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणात 21 मार्च रोजी ब्राम्हणवाडा थडी पोलिसांनी अल्पवयीन मुलीच्या आई-वडीलासह कुटुंबातील इतर 9 जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ब्राह्मणवाडा थडी पोलीस स्टेशन परिसरातील रहिवासी असणार्या अल्पवयीन मुलीचा विवाह राजस्थानचा रहिवासी शाहरुख शाह नामक तरुणासोबत ठरविण्यात आला.

मुलीच्या कुटुंबाने फेब्रुवारी 2023 मध्ये मुलीचे लग्न केले. लग्नानंतर मुलगी राजस्थानमध्ये तिच्या सासरी घरी गेली. दरम्यान, 30 एप्रिल 2024 रोजी ती गर्भवती राहिल्याने तिला तिच्या माहेरी पाठविण्यात आले. जिथे पालकांनी अल्पवयीन मुलीला प्रसूतीसाठी जिल्हा स्त्री रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी मुलीचे आधार कार्ड पाहिल्यानंतर ती अल्पवयीन असल्याचे समोर आले. रुग्णालय प्रशासनाने याची माहिती तात्काळ गाडगेनगर पोलिसांना दिली. पोलिसांनी रुग्णालयात पोहोचून अल्पवयीन मुलीचा जबाब नोंदवला. त्यानंतर पोलिसांनी पती आणि आई, आजी, आजोबा, सासू, सासरे यांच्यासह कुटुंबातील 9 जणांवर गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. ब्राह्मणवाडा थडी येथे बालविवाह होत असल्याने गाडगेनगर पोलिसांनी हे प्रकरण ब्राह्मणवाडा थडी पोलिसांकडे सोपविले आहे.

# जिल्हा ग्रामीण पोलिसांनी गोवंश तस्करीविरोधात छेडली विशेष मोहीम

## दैनिक महासागरच्या वृत्ताची दखल


हिंदुत्ववादी सरकार असूनही कत्तलीसाठी गोवंशाची तस्करी

कॉउ स्कॉड निष्क्रिय ? ■ मध्यप्रदेशातून खुलेआम होते वाहतूक

मग त्या कारवाया का थांबल्या ?

पोलिसांची मूकसंमती तर नाही ना!

पालकमंत्र्यांनी घालावे लक्ष




गोवंश हत्याबंदी कायद्याची जिल्ह्यात पायमल्ली

तस्करीसाठी बनावट ईटॅगचा वापर ● प्रकरण उघडकीस येउनही कारवाई नाही

येथून होते तस्करी

पालकमंत्र्यांनी लक्ष द्यावे

शिंदे सरकारने स्थापन केला होता आयोग

**बादल डकरे**

**चांदूर बाजार,(दि.22)-** अमरावती ग्रामीण पोलीस दलातील पोलीस स्टेशनच्या हद्दीतून मोठ्या प्रमाणावर कत्तलीकरिता गोवंश तस्करी होत असल्याची वृत्त मालिका दैनिक महासागर ने आपल्या तीन अंकातून प्रसिद्ध केल्यानंतर ग्रामीण पोलीस हरकतीत आले आहे. ग्रामीण पोलिसांनी गोवंश तस्करीविरोधात विशेष मोहीम छेडली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेने ग्रामीण पोलीस दलातील परतवाडा, वरुड, दर्यापूर, अचलपूर, मोर्शी पोलीस स्टेशन हद्दीत अवैध गोवंश विक्रीवर कारवाईला सुरवात केली आहे. गोमास विक्री व गोवंश तस्करीच्या प्रकरणांमध्ये विशेष लक्ष दिले जात आहे. या मोहीम अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने मोर्शी पोलीस स्टेशन हद्दीत 14 गोवंशांना जीवनदान दिले असून य ा कारवाई 14 गोवंशासह 250 किलो गोमास जप्त केले आहे. नुकतेच धारणी पोलीसांनी देखील गोवंश तस्करीविरुध्द कारवाई करत गोवंशांना जीवदान दिले. या कारवाया नियमित सुरू राहाव्यात अशी मागणी गोरक्षकांकडून केली जात आहे. तसेच आसेगाव,,शिरजगाव कसबा,ब्राम्हणवाडा थडी, चांदूर बाजार, भातकुली, तळेगाव दशासर, धामणगाव रेल्वे, कुऱ्हा, चांदूर रेल्वे, माहुली जहागीर, मंगळूर, तिवसा, बेनोडा, शिरखेड, सरसमपूरा, अंजनगाव सुर्जी या ठिकाणी अद्यापही कारवाई न झाल्याने येथील पोलीस अधिकाऱ्यांनीही गोवंश तस्करीविरुध्द कारवाया कराव्यात अशी मागणी होत आहे.

### विशेष मोहीमेत झालेल्या कारवाया

मोर्शी पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी शे.युनुस शे. शब्बीर व अब्दुल हाफीज अब्दुल अजीज (दोन्ही रा. पेठपुरा, मोर्शी) यांचेवर कारवाई करुन त्यांचे ताब्यातुन 95 किलो गोमांस कि.अ.19,000/- रु, 06 जिवंत गोवंश कि.अं.64,000 असा एकुण 89,400 रु. चा माल जप्त केला. वरुड पोलीस स्टेशन अंतर्गत - पो.स्टे. आरोपी नामे अमीर खान हमीद खान,(रा. वरुड) याच्या ताब्यातुन 45 किलो गोमांस कि.अ.6750 रु. चा माल जप्त करण्यात आला. परतवाडा पोलीस स्टेशनअंतर्गत आरोपी नामे शे. शफीक शे. शरीफ (रा. मुगलाईपुरा, परतवाडा) याचेवर परतवाडा पोलीसांनी कारवाई करुन त्यांचे ताब्यातुन 40 किलो गोमांस कि.अ.4800 रु. चा माल जप्त करण्यात आला आहे. अचलपुर पोलीस स्टेशनअंतर्गत आरोपी नामे से.साजीद से. सलीम,(रा. अचलपुर) याचेवर अचलपुर पोलीसांनी कारवाई करुन त्यांचे ताब्यातुन 70 किलो गोमांस कि.अ.14,000 रु. चा माल जप्त केला. ही कारवाई पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, यांचे मार्गदर्शनात अमरावती ग्रामीण जिल्हयात विविध पो.स्टे.व स्था.गु.शा. पथकाव्दारे करण्यात आली.

### काऊ स्कॉड चे काय ?

गोवंश तस्करी विरुध्द ग्रामीण पोलीसांनी विशेष मोहीम छेडली, मात्र काऊ स्कॉड सुरू करून पुन्हा कारवाई सुरू होतील का? हा प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहे. तसेच कारवाई न करणाऱ्या ठाणेदारांची उचलबांगडी केली जाणार का? असाही सवाल नागरिकांकडून विचारल्या जात आहे.

# देशी कट्ट्यासह चायना चाकू घेऊन फिरणाऱ्या तरुणाला अटक

### ट्रान्सपोर्ट नगरमधील घटना

### गुन्हे शाखेची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 22) -** नागपुरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहेमत नगरमध्ये देशी बनावटीचे पिस्तूल आणि चायना चाकु घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका तरुणाला गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक सीमा दाताळकर यांच्या पथकाने 22 मार्च रोजी अटक केली आहे. मोहम्मद आसिफ उर्फ पंजा वल्द नुर मोहम्मद (28, रा. रहेमत नगर, अमरावती) असे अटक आरोपीचे नाव आहे. या आरोपीकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि चायना चाकू जप्त करण्यात आला आहे.

पोलिस आयुक्तालय परिसरात अवैध शस्त्र बाळगणाऱ्या आरोपींवर कारवाई करण्याच्या सूचना पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी दिल्या होत्या. त्या अनुषंगाने गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक सीमा दाताळकर यांच्या आदेशावरून गुन्हे शाखेचे अधिकारी व अधिकाऱ्यांनी पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान 22 मार्च रोजी दुपारी 3.25 वाजता मोहम्मद आसिफ नामक तरुण हा ट्रान्सपोर्ट नगरच्या गेटसमोर देशी बनावटीचे पिस्तूल आणि चायना चाकू घेऊन लोकांमध्ये दहशत निर्माण करत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यामुळे पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठले आणि पोलिसांनी मोहम्मद आसिफला अटक केली. पोलिसांनी आरोपींकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि चायना चाकू जप्त केला आहे. जप्त केलेल्या मालाची किंमत 36 हजार 200 रुपये असल्याचे सांगण्यात आले. आरोपी मोहम्मद आसिफ याला नागपूरी गेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पोलिसांनी आर्म ?क्टनुसार गुन्हा दाखल केला आहे. सदरची कारवाई पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, पोलिस उपायुक्त कल्पना बारवकर, पोलिस उपायुक्त सागर पाटील, गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे, पोलिस निरीक्षक सिमा दाताळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक इम्रान नायकवडे, पोलीस अमलदार युसूफ सौदागर, अजय मिश्रा, संजय भारसाकळे, नईम बेग, चेतन कराडे, रामकृष्ण कांगळे, भूषण पदमने यांनी केली.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# राष्ट्रीय लोक अदालतीत 13609 प्रकरणांचा निपटारा

**23 कोटी 49 लाख 43 हजार 325 रुपयांच्या तडजोडीतून न्याय निवाडा | मोटार अपघात दावा : पक्षकाराला मिळाला 96 लाखांचा धनादेश**

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती, ( दि. 22 ) - जिल्हा व सत्र न्यायालयात शनिवारी ( दि. 22 ) रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीत 13609 प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. या माध्यमातून विविध प्रकरणांमध्ये 23 कोटी 49 लाख 43 हजार 325 रुपयांच्या तडजोडीतून न्याय निवाडा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे मोटार अपघात दावा प्राधिकरणामध्ये पक्षकाराला मिळाला 96 लाखांचा धनादेश मिळाला आहे.*




या लोक अदालतीमध्ये संपूर्ण जिल्हयातुन एकुण 28410 दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी 8608 प्रकरणांचा तर एकुण 15913 प्रलंबित प्रकरणांपैकी 2373 प्रकरणे अशा एकुण 10981 प्रकरणांचा यशस्वीरित्या निपटारा करण्यात आला. सदर राष्ट्रीय लोकअदालतीच्या माध्यमातुन तेवीस कोटी ऐकोणपन्नास लाख त्रेचाळीस हजार तिनशे पंचवीस रुपये तडजोडीच्या रकमेच्या प्रकरणांचा न्यायनिवाडा झाला. अमरावती येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष सुधाकर वें. पार्लगड्डा तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव मंगला दे. कांबळे, इतर न्यायाधीश वर्ग, जिल्हा वकिल संघ अध्यक्ष ॲड. व्ही. एस. काळे, तसेच इतर सदस्य, जिल्हा वकिल संघ, अमरावती आणि सरकारी वकिल संघातिल सन्माननिय सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली लोक अदालत यशस्वीरित्या पार पडली.

## जिल्ह्यात एकुण 48 मंडळ (पॅनल) ची निर्मिती

जिल्हा व सत्र न्यायालय 22 मार्च रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. सदर राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, दिवाणी व फौजदारी प्रकरणे, बँकेचे प्रलंबित प्रकरणे, चेक न वटवल्याचे प्रकरणे (निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट), भुसंपादन प्रकरणे, विवाह संबंधी कायद्याचे दावे, बँकेचे तसेच दिवाणी आणि फौजदारी अपील व इतर दिवाणी प्रकरणे संबंधीत दाखलपूर्व प्रकरणे सुध्दा तडजोडीकरिता लोकअदालतीसमक्ष ठेवण्यात आली होती. लोक अदालतीमध्ये ठेवलेल्या प्रकरणांची पुर्तता करण्यासाठी संपुर्ण जिल्हयात एकुण 48 मंडळ (पॅनल) ची निर्मिती करण्यात आली होती. ज्यामध्ये न्यायाधीश, अधिवक्ता गण तसेच न्यायालयीन कर्मचारी यांचा समावेश होता. जिल्हा व सत्र न्यायालयात आयोजित प्रस्तुत लोकअदालतीला भारी प्रतिसाद मिळाला असुन जनतेने प्रचंड प्रमाणात सहभाग घेतला.

### स्पेशल ड्राईव्हमध्ये 2628 प्रकरणांचा निपटारा

उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे 17 ते 21 मार्चपर्यंत विशेष मोहिम राबविण्यात आलेली होती. या मोहिमेअंतर्गत 2628 प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. अशाप्रकारे एकूण 13609 प्रकरणांचा निपटारा या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये करण्यात आला.

## पक्षकाराला मिळाला 96 लाखांचा धनादेश

जिल्हा व सत्र न्यायाधीश (3) एच.एल. मनवर यांच्या न्यायालयातील मोटार अपघात दावा प्राधिकरण क्रमांक 460/2023 च्या सागर शिरसाठ विरुध्द गौरव मोहोड हे प्रकरण ठेवण्यात आले होते. सदर प्रकरणामधील सागर शिरसाठ यांच्या पत्नी प्रियंका यांचा पंचवटी ते शेगाव नाका रोडवरिल गाडगेबाबा मंदिराजवळ 2023 मध्ये अपघातामध्ये जखमी होउन मृत्यू झाला. त्या पोलिस हवालदार पदावर कार्यरत होत्या. सदर दावा लोक अदालतध्ये निकाली निघाला. अर्जदार सागर शिरसाठ यांना गो डीजीटल जनरल इन्शुरन्सतर्फे 96 लाखांचा धनादेश प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर वें. यार्लगड्डा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सदर प्रकरणात अर्जदार सागर शिरसाठ यांच्याकडून अधिवक्ता सर्वश्री हरीश निंबाळकर, मनिष बिडकर, मनिष शिरसाठ यांनी बाजू मांडली, तर इन्शुरन्स कंपनीतर्फे अधिवक्ता अक्षय पवार, काजल खांडेकर यांनी बाजू मांडली. लोक अदालत पॅनल प्रमुख म्हणून तदर्थ जिल्हा न्यायाधीश (1) पी.ए. साबळे यांनी काम पाहीले. तर पॅनल अधिवक्ता म्हणून ॲड. पूनम मुंडे यांनी काम पाहीले. यावेळी एकूण 70 दरख्वास्त प्रकरणे निकाली निघाले असून त्यामध्ये 3 कोटी 58 लाखांची वसूली झाली, तर एकूण 65 मोटार अपघात प्रकरणे निकाली निघाली. त्यामध्ये एकूण 4 कोटी 99 लाख 85 हजार 647 रुपये पक्षकाराना धनादेशाव्दारे देण्यात आले.

# शिरजगाव (कसबा) जि.प. शाळेच्या एका शिक्षिकेवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**बदलीचा लाभ मिळणेकरीता अपंगत्वाचे बनावट व खोटे प्रमाणपत्र**

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.22 )** - बदली प्रक्रिया सन 2022 मध्ये संवर्ग - 1 मधुन बदलीचा लाभ मिळणेकरीता अपंगत्वाचे बनावट व खोटे प्रमाणपत्र सादर करुन प्रशासनाची दिशाभुल केल्याप्रकरणी चांदूर रेल्वे तालुक्यातील निमगव्हाण येथील जि.प. शाळेच्या तत्कालीन सहाय्यक शिक्षिका व सद्यास चांदूर बाजार तालुक्यातील जि.प. शाळा शिरजगाव (कसबा) येथे कार्यरत असणार्‍या ज्योती कृष्णराव बरडे यांच्याविरूध्द चांदूर रेल्वे पोलीसांत गुरूवारी (ता. 20) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे शिक्षण विभागात एकच खळबळ उडाली आहे.

सुत्रांच्या माहितीनुसार, ज्योती कृष्णराव बरडे ह्या चांदूर रेल्वे तालुक्यातील जि.प. पुर्व माध्यमिक शाळा, निमगव्हाण येथे सन 2022 मध्ये कार्यरत होत्या. अशातच 2022 च्या बदली प्रक्रियामध्ये संवर्ग-1 मधुन बदलीचा लाभ मिळणेकरीता अपंगत्वाचे बनावट व खोटे प्रमाणपत्र सादर करून प्रशासनाची दिशाभुल केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.

प्रशासनाची दिशाभुल केल्याचे विभागीय खाते चौकशीमध्ये सिद्ध झाले असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद, अमरावती) यांचे निर्देशानुसार स्थानिक पं.स. चे विस्तार अधिकारी (शिक्षण) विनय देशमुख यांनी याबाबतची फिर्याद चांदूर रेल्वे पोलीसांत दिली. यावरून चांदूर रेल्वे पोलीसांनी सद्यास जि.प. शाळा शिरजगाव कसबा (पं.स. चांदूर बाजार) येथील सहाय्यक शिक्षिका ज्योती कृष्णराव बरडे यांच्याविरूध्द भादंवी कलम 417, 420 अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहे.

# वरुड न्यायालयाच्या आवारात 60 वर्षीय इसमाचा मृत्यू!

**तारखेवर पुकाऱ्याची करीत होते प्रतिक्षा**

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड (दि. 22)** - अमरावती न्यायालयात तारखेवर आलेल्या एका 60 वर्षीय इसमाचा अचानक चक्कर येऊन खाली पडल्यानंतर मृत्यू झाला. विश्वनाथ नथ्थुजी डबरासे (60, रा. लोणी) असे मृताचे नाव आहे. ह्यदयविकाराचा झटका आल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती पुढे आली आहे.

लोणी येथील दोन भावांचा शेतीचा वाद न्यायालयात सुरू होता. 20 मार्च रोजी विश्वनाथ डबरासे हे शेती वादातील न्याय प्रविष्ट प्रकरणात वरूड न्यायालयात दुपारी दिड वाजता तारखेवर हजर झाले होते. ते पुकाऱ्याची वाट पाहत असताना, ताटकळत उभे होते. दरम्यान त्यांना अचनाक चक्कर आल आणि ते न्यायालय आवारातच खाली पडले. दरम्यान उपस्थीत वकील ?ड. श्रीनिवास यांनी त्यांना तत्काळ ग्रामीण रूग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ.भुम्बर यांनी ह्दय विकाराच्या झटक्याने मृत्यू झाला असल्याची माहिती दिली. मृत्यूची माहिती डबरासे कुटुंबीयाना देण्यात आली. माहिती मिळताच कुटुंबीय रूग्णालयात दाखल झाले. कुटुंबीयांनी त्यांच्या पार्थिवावर शवविच्छेदनासाठी विरोध दर्शविला. त्यानंतर सायंकाळी 7 वाजता मृतदेह नातेवाईकाच्या स्वाधीन करण्यात आला.

## तरज्वाचले असते प्राण

न्यायालयामध्ये शेतीच्या घरघुती वादामधील नायप्रविष्ठ प्रकरणामध्ये तारखेवर हजर झालेले विश्वनाथ डबरासे यांना न्यायालयाच्या आवारातच अचानक चक्कर आली आणि ते खाली पडले. त्यावेळी रुग्णाला शेंदुरजना घाट पोलिसांच्या वाहनात नेण्याबाबत उपस्थीत वकीलांनी पोलिस अधिकारी मंगेश शेगोकार यांना विनंती केली असता संबंधित अधिकार्यांनी रुग्णाला मदत करण्यास नकार देत वकीलांसोबत हुज्जत घातली. यामध्येच वेळ वाया गेला.

# मोर्शी येथील नळा नदीवरील पुलाचे काम तातडीने पुर्ण करा!

**निंभी टोल नाका बंद करा - खासदार अमर काळे | केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हयांचेकडे मागणी**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.22 )** - वर्धा लोकसभा मतदार संघाचे खासदार अमर काळे हयांनी आज दिल्ली येथे केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांची भेट घेऊन मोर्शी वरुड क्षेत्रातील विविध कामे मार्गी लावण्याबाबत निवेदन दिले व कामे तातडीने पुर्ण करण्याबाबत चर्चा केली. दिलेल्या निवेदनाच्या माध्यमातून त्यांनी नांदगाव पेठ-मोर्शी-वरुड राष्ट्रीय महामार्ग 353ज्ञ वरील नळा नदीवरील पुलाचे अपुर्ण बांधकामामुळे वाहतुकीत होणारा अडथळा व संभाव्य अपघाताची शक्यता लक्षात घेता वाहतुक सुरळीत होण्याचे दृष्टीने अपुर्ण पुलाचे



बांधकाम तातडीने पुर्ण करणे तसेच राष्ट्रीय महामार्ग 353ज्ञ नांदगाव (पेठ) ते मोर्शी रोडवर मोर्शी-अमरावती अंतर केवळ 50 कि.मी. असतांना असलेले दोन टोलनाक्यामुळे वाहतुकदारावर जास्तीचा आर्थिक भुर्दंड पडतो. हया भागातून शेती उत्पादने दररोज अमरावती बाजारपेठेत विक्रीसाठी जात असल्याने हयाचा शेतकऱ्यांना व माल वाहतुकदारांना जास्तीचा आर्थिक भुर्दंड बसत आहे. त्यामुळे मोर्शी रोडवरील निंभी टोलनाका बंद करण्याबाबतची मागणी केली. वरील दोन्ही मागण्या तातडीने पुर्ण करण्याबाबत खासदार अमर काळे यांनी नितिन गडकरी हयांचेकडे आग्रही मागणी केली.

# समाजमाध्यमांवर आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित करु नये

**नागरिकांना मोर्शी पोलिसांचे आवाहन**

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.22 )** - आक्षेपार्ह पोस्टमुळे गेल्या काही महिन्यांत घडलेल्या समाज विघातक घटनांच्या पाश्वभूमिवर मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहिवाशांना पोलिसांनी समाज माध्यमांवरील पोस्टच्या बाबतीत सूचना केल्या असून आक्षेपार्ह पोस्ट टाकणे टाळावे असे सांगितले आहे.

व्हाट्सअप ग्रुप, फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, स्नॅपचॅट तथा इतर एप्लीकेशनच्या माध्यमातून कोणत्याही व्यक्तीच्या, वंशाच्या, समाजाच्या, जातीच्या, धर्माच्या व वर्णाच्या भावना दुखावतील अशा स्वरूपाच्या पोस्ट, कॉमेंट, स्टोरी स्टेटस, डिजिटल बॅनर असे प्रकार प्रसारित करू नये. तसेच कोणाच्याही विरोधात घोषणाबाजी अथवा नारेबाजी करू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. व्हाट्सअप ग्रुप ॲयडमिन यांनी आपले व्हाट्सअप ग्रुप मध्ये सेटिंग मध्ये ओन्ली एडमिन सेंड अशी सेटिंग करून बदल करून घ्यावा, जेणेकरून ग्रुप मधील कोणतेही सदस्य वादग्रस्त पोस्ट ग्रुपवर टाकणार नाहीत. तसेच अशाप्रकारे वादग्रस्त पोस्ट टाकल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट करणार्या संबंधिताना जबाबदार धरून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. असे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी कळविले आहे.

# मिना बाजारासाठी इतवारा ते जवाहर गेट रस्ता जड वाहतुकीसाठी बंद

**24 ते 29 मार्चदरम्यान मीना बाजारात खरेदीसाठी राहणार गर्दी**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.22 )** - शहरातील रमजान महिन्याच्या अनुषंगाने जवाहर गेट ते टांगापडाव रोडपर्यंत मिना बाजार भरणार आहे. या उत्सवात मिना बाजारात खरेदीदारांची मोठी गर्दी उसळते. त्यामुळे 24 ते 29 मार्च या कालावधीत इतवारा बाजार ते जवाहर गेटपर्यंतची जड वाहतुक बंद ठेवण्यात येणार आहे.

मीना बाजार उभारण्यासाठी हजरत सय्यद साहेब बाबा दर्ग्याचे व्यवस्थापक फिरोज खान उर्फ जावेद यांच्याकडून पोलिसांना अर्ज प्राप्त झाला आहे. मीना बाजारात खरेदी करण्यासाठी लोकांची मोठी गर्दी होते. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून, इतवारा बाजार टी-पॉइंट ते गांधी चौक या मुख्य रस्त्यावरील वाहतूक



नियंत्रित करणे आवश्यक आहे. त्यामुळे पोलीस विभागाने या मार्गावरील जड वाहनांची वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे. मोटार वाहन कायद्यांतर्गत अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई केली जाईल, अशी माहिती पोलिस विभागाने दिली आहे.

## पर्यायी मार्गाचा वापर करा

रेती, गिट्टी आणि इतर वस्तू वाहून नेणारी वाहने गद्रे चौकातून राजकमल चौक, जयस्तंभ चौक, मालवीय चौक, दीपक चौक मार्गे चित्रा चौक मार्गाचा वापर करतील किंवा जुन्या बायपास मार्गाने चपराशीपुरा चौक, बियाणी चौक, गर्ल्स हायस्कूल चौक, इर्विन चौक, दीपक चौक मार्गे चित्रा चौकात येऊ शकतील. दुचाकी आणि सायकलस्वार राजकमल चौक, श्याम चौक, तहसील कार्यालय, सावनपुरा चौकी, प्रभात चौक येथून चित्रा चौकाकडे येतील. याशिवाय जड वाहनांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागेल.

# शेती, मानव-वन्यजीव सह अस्तित्वावर कार्यशाळा

- मेळघाटातील हरिसालमध्ये झाले आयोजन
- कृषी उत्पादकता व वन संवर्धनावर चर्चा

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.22 )** - वन्यजीवांमुळे होणारे पिकांचे नुकसान, त्यासाठी मिळणारी भरपाई व ऑनलाइन प्रक्रिया, सरकारी निर्णय आणि मानव-वन्यजीव संघर्ष या विषयावर महत्त्वपूर्ण चर्चासत्र गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे आणि निसर्ग इन्स्टिट्यूट फॉर सोशल ?क्शन रिसर्च गाइडन्स अँड असेसमेंट, मेळघाट यांनी संयुक्तपणे आयोजित केले होते.

वाघ, रानडुक्कर आणि माकडे यांसह वन्यजीवांचा शेतीशी संघर्ष वाढत असताना, विद्यमान धोरणे आणि भरपाई यंत्रणेतील तफावत समजून घेणे आता पूर्वीपेक्षा जास्त महत्त्वाचे झाले आहे. वन्यजीवांमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची भरपाई देण्याबाबतच्या सध्याच्या सरकारी निर्णयातील त्रुटी हा चर्चासत्रातील एक मध्यवर्ती विषय होता. सरकार वन्यजीवांमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देते, परंतु ही प्रक्रिया अनेकदा मंद, अकार्यक्षम आणि अनेक शेतकर्यांहसाठी विशेषत: ग्रामीण भागात अस्पष्ट राहते. तज्ज्ञांनी चर्चा केली की प्रणालीतील एक प्रमुख त्रुटी म्हणजे भरपाईचे विलंबित वितरण, ज्यामुळे शेतकर्यांना मदतीची वाट पाहत असताना आर्थिक अडचणी येऊ शकतात. याव्यतिरिक्त, दिलेली भरपाई बहुतेकदा प्रत्यक्ष झालेल्या नुकसानाशी सुसंगत नसते आणि दावे दाखल करण्यात गुंतलेली नोकरशाही प्रक्रिया ग्रामीण समुदायांसाठी एक महत्त्वाचा अडथळा ठरू शकते. ज्यांना प्रणालीमध्ये



नेव्हिगेट करण्यासाठी आवश्यक संसाधने किंवा ज्ञान उपलब्ध नसते. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पडताळणी आणि कागदपत्रांच्या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव, ज्यामुळे अन्याय्य भरपाई वितरण होऊ शकते. शेतकर्यांचे दावे पुरेसे प्रक्रिया केलेले नसताना अनेकदा निराश होतात आणि सर्व प्रभावित व्यक्तींपर्यंत पोहोचण्यास सरकारची असमर्थता ही समस्या आणखी वाढवते. याबाबत या कार्यशाळेत मंथन करण्यात आले. त्यासोबतच वन्यजीवांमुळे पिकांचे नुकसान होण्यापासून रोखण्यासाठी दीर्घकालीन उपायांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. डॉ. वाटवे आणि डॉ. नुलकर यांनी वन्यजीवांपासून त्यांच्या पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकरी वापरू शकतील अशा विविध पद्धतींवर चर्चा केली, ज्यात विद्युत कुंपणांची अंमलबजावणी, वन्यजीव प्रतिबंधकांचा वापर आणि वन्यजीवांच्या घुसखोरीला परावृत्त करणारी धोरणात्मक पीक लागवड याविषयी चर्चा केली. शेतकरी, स्थानिक अधिकारी आणि वन विभागाच्या अधिकार्यांवनी वन्यजीवांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी आणि वन्यजीवांचे संवर्धन करताना पिकांचे नुकसान रोखण्यासाठी उपाययोजना राबविण्यासाठी एकत्र काम करावे. संवर्धन प्रयत्नांमध्ये स्थानिक समुदायांना सहभागी करून घेतल्याने केवळ पर्यावरणाचे संरक्षण होण्यास मदत होत नाही तर मालकी आणि जबाबदारीची भावना देखील वाढते, जी दीर्घकालीन यशासाठी आवश्यक आहे. असे डॉ मिलिंद वाटवे यांनी सांगितले. या चर्चासत्राला तारूबंदा, केली, आढाव, मांगीया, रोरा, चिखली, हरिसाल, चौरकुंड, बोथरा येथील गावकरी उपस्थित होते. तारूबांदा व हरिसाल परीक्षेत्राचे वनपाल, वनरक्षक हे सुद्धा यावेळी उपस्थित होते.

# शेतीसाठी स्प्रे पंपाला 100 टक्के अनुदान

**कृषी विभागाची योजना | सोयबीन,कापूस उत्पादकांसाठी लाभदायक**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 22)** महाडीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानासाठी अर्ज दाखल करायचे होते. त्यासाठी ऑनलाइन प्रस्ताव मागविण्यात आले होते. यासाठी ऑनलाइन प्रस्ताव कमी आल्याने ऑफलाइन स्वरूपात अर्ज मागविण्यात आले आहेत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून जेवढे अर्ज येतील, त्यांना पंप वितरित होणार आहेत.

कृषी विभागाने कीड व्यवस्थापन आणि उत्पानवाढीसाठी शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर स्प्रे पंप देण्याचा निर्णय घेतला होता. यातून राज्यभरात महाडीबीटी पोर्टलवर अर्ज मागविण्यात आले. ऑनलाइन अर्ज कमी दाखल झाल्याने कृषी विभागाने ऑफलाइन स्वरूपातही अर्ज मागविले होते. त्यामुळे अर्ज दाखल करणाऱ्या प्रत्येकाला स्प्रे पंप मिळाला. जिल्ह्यात ऑनलाइन अर्ज दाखल करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी आहे. शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळविण्या साठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याकरिता एकच गर्दी झाली आहे. अनेकांना ऑनलाइन स्वरूपात अर्जच दाखल करता आले नाहीत. ऑफलाइन अर्जामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. एका सातबारावर एका



शेतकऱ्याला एकच कृषी पंप दिला जातो. त्यासाठी शेतकऱ्याचा सातबारा, 8-अ, आधारकार्ड या बाबीची तपासणी केली जाते. पती आणि पत्नी दोघांच्या नावाने दोन सातबारा असतील, तर दोघांपैकी एकालाच स्प्रेपंप दिला जाणार आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर स्प्रे पंप देण्याचा निर्णय घेतला होता. या योजनेंतर्गत शेतकऱ्यां कडून आलेल्या अर्जाची लॉटरी काढली जाते. ऑनलाइन स्वरूपात लॉटरी पद्धतीने शेतकऱ्यांची निवड पद्धतीनेच ऑफलाइन स्वरूपात निवड करून सर्वत्र लाभार्थ्यांना लाभ दिला जाणार आहे. मात्र जिल्ह्याला या योजनेतून वगळण्यात आले आहे.

### बॅटरी संचलित पंप बॅटरीवर चालणारा पंप

आधुनिक स्वरूपाचा आणि गतिमान पंप आहे. त्यामुळे कमी वेळात अधिक शेतशिवारावर स्प्रे करता येतो. याच प्रमुख कारणामुळे शेतकऱ्यांनी बॅटरी संचाच्या पंपाच्या खरेदीसाठी गर्दी केली आहे. कापूस व सोयाबीन उत्पादकांना स्प्रे करण्या साठी पंप उपयोगाचा आहे.

# आमदार खोडकेंचे जल्लोषात स्वागत









अमरावती– राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व नवनिर्वाचित विधान परिषद सदस्य आमदार संजय खोडके यांचे आज शहरागमन झाल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी अमरावती रेल्वे स्टेशनवर त्यांचे जल्लोषात स्वागत केले. याप्रसंगी सत्कार करताना माजी मंत्री तथा भाजप शहराध्यक्ष प्रविण पोटे पाटील, माजी उपमहापौर चेतन पवार, नितीन भेटाडू, अजय टवलारकर, ॲड.सुनील बोळे, संजय बोबडे, राजू चौधरी, जिल्हा बँकेचे संचालक अजय पाटील इत्यादी मान्यवर हजर होते. ( छायाचित्र मनिष जगताप )

## आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना सामुहिक उपोषणातून श्रध्दांजली

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 22 ) –** यवतमाळ जिल्ह्यातील चिखलगव्हाण येथील कौटुंबिक आत्महत्याग्रस्त शेतकरी साहेबराव करपे यांच्या स्मृती दिनानिमित्त मोर्शी तालुक्यातील लेहगावात शेतकऱ्यांनी वैयक्तिक उपवास, सामूहिक उपोषण करून श्रद्धांजली (दि.19) दिली.



यवतमाळ जिल्ह्यातील चिखलगव्हाण येथील सुशिक्षित व प्रगतशील शेतकरी त्याचबरोबर चिखलगव्हाणचे माजी सरपंच साहेबराव करपे यांच्याकडे तेव्हा साठ एकर शेती होती. त्यापैकी दहा एकरामध्ये त्यांनी गहू पेरला होता. गव्हाला शेवटचे पाणी द्यायचे होते. साहेबराव करपे यांच्याकडे वीज वितरण कंपनीचे बिल थकित होते. बिलाच्या मागणीकरिता वीज वितरण कंपनीचे कर्मचारी आले आणि विज बिल भरण्याचा आग्रह धरला. मात्र करपे पाटलाकडे पैसे नसल्यामुळे त्यांनी गहू निघाल्यावर विकून बिल भरतो, अशी विनवणी केली. मात्र निगरगट्ट वीज कर्मचाऱ्यांनी त्यांचे वीज कनेक्शन कापले. त्यानंतर त्याच बाबीचा पश्चाताप साहेबराव पाटलांना झाला. आपलीच परिस्थिती अशी आहे. तर बाकी शेतकऱ्यांचं काय? असा प्रश्न त्यांच्या मनामध्ये निर्माण झाला. त्याच विचारात त्यांनी सहकुटुंब जीवन संपविण्याचा निर्णय घेतला व कुटुंबासह पवनार जवळच्या दत्तापूर आश्रमात जाऊन मुक्काम केला. त्यानंतर रात्रीच्या जेवणात विषारी औषध टाकून कुटुंबासह सामूहिक जीवन यात्रा संपवली. ही सामूहिक शेतकरी आत्महत्या म्हणून शासनाने पहिली नोंद घेतली. तेव्हापासून या शेतकरी कुटुंबीयांच्या स्मृतिदिनी संवेदना व श्रद्धांजली कार्यक्रम किसान पुत्र आंदोलन म्हणून बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई येथील अमर हबीब हे महाराष्ट्रभर एक दिवशीय उपवास अन्नत्याग आंदोलन चालवितात. याच अनुषंगाने किसान पुत्र अन्नत्याग आंदोलनाला मोर्शी तालुक्यातील लेहगाव येथे मुख्य चौकात 19 मार्च रोजी संदीप रोडे यांच्या नेतृत्वात अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. यावेळी लेहगाव येथील उपसभापती संजय तट्टे, सभापती सचिन ठोके, मुरलीधर डहाणे, डॉ. चंद्रकांत देशमुख, बाळासाहेब कोराटे, विद्याधर कोरे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष गिरीश कराळे व इतर अनेक शेतकरी या अन्नत्याग आंदोलनाला उपस्थित होते.

## पॅरा व्हॉलिबॉल संघात भातकुली तालुक्यातील खेळाडू अव्वल

**टाकरखेडा संभु –** पॅरालिम्पक कमेटी ऑफ इंडिया, पॅरा व्हॉलिबॉल फेडरेशन ऑफ इंडिया व पॅरा व्हॉलिबॉल असोसिएशन ऑफ तामिळनाडू यांच्या संयुक्त विद्यमाने 13 वि राष्ट्रीय पॅरा व्हॉलिबॉल चॅम्पियनशिप इरोड, (तामिळनाडू) येथे आयोजित केली आहे. पॅरा व्हॉलिबॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्र तर्फे महाराष्ट्र संघासाठी नागपूर येथे निवड शिबीर आयोजित केले (दि.20) होते. त्यामध्ये भातकुली तालुक्यातील पूर्णानागरचे हेमंत महिंगे व गजानन मेहल्डे यांची निवड महाराष्ट्र पॅरा व्हॉलिबॉल संघात झाली. तसेच जळका हिरापूर येथील सचिन पाखरे यांची महाराष्ट्र पॅरा व्हॉलिबॉल संघाच्या टीम मॅनेजर पदी निवड झाली. हे सर्व खेळाडू दिव्यांग क्रीडा क्षेत्रात काम करणारी अमरावती क्रिकेट असोसिएशन ऑफ फिजिकली चॅलेंज चे खेळाडू आहे. असोसिएशनचे पदाधिकारी भैया पवार, आशिष देशमुख, धनंजय देशमुख, प्रशांत गोरले, उमेश महिंगे, धम्मापाल गावंडे, प्रितेश भुंबर यांनी निवड झालेल्या खेळाडूंचे कौतुक केले आहे.

## आचार्य पदवीप्राप्त डॉ.मंजुषा बारबुध्दे यांचा सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 22 ) –** कोरोना काळात बाधित रुणांचे आभासी पद्धतीने समुपदेशन करतांना अनेक अडचणी निर्माण झाल्या. मात्र या काळात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन विभागांतर्गत येणा–या समुपदेशन व मानसशास्त्राच्या शिक्षिका डॉ. मंजुषा बारबुध्दे (चौधरी) यांनी भीती, मृत्यू आणि मानसिक अस्वस्थतेचा अनुभव घेतला आणि या विषयावरच आचार्य पदवी प्राप्त करण्याचा प्रण घेतला. त्यांनी कोरोना संक्रमित रुग्णांचे मानसिक स्वास्थ्य, ताण आणि मृत्यूच्या भीतीचे मापन या विषयात आचार्य पदवी प्राप्त केली. त्यामुळे डॉ. मंजुषा बारबुध्दे यांचा कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या हस्ते (दि.21) सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, व्य.प. सदस्य डॉ. मनीषा कोडापे, आंतरविद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, बिजभाषक डॉ. अलका गायकवाड आदी विचारपीठावर उपस्थित होते. कोरोना हा मानवी जीवनात दहशतीचे वातावरण निर्माण करणारा ठरला. भविष्यात अशा प्रकारचे संक्रमण निर्माण झाले तर या भीतीतून बाहेर काढण्यासाठी डॉ. मंजुषा बारबुध्दे यांचा विषय अतिशय महत्त्वाचा ठरतो. प्रत्येक अभ्यासक्रमाच्या प्राध्यापकांनी आपल्या भावी जीवनात अशाच प्रकारचे यश संपादन करीत आपल्या वैचारिक संपन्नतेचा आलेख चढत ठेवला पाहिजे असे आवाहन याप्रसंगी डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. यावेळी विद्यापीठातील विभाग प्रमुख,



## संत अच्युत महाराजांना अभिप्रेत असलेली सेवा घडली - नितीन गडकरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 22 )** गोरगरीब जनतेची सेवा ही महत्वाची असून अशा कार्यांना कायम मदत केली जाईल. रुग्णालयामार्फत देणगी आणि नागरिकांच्या सहभागातून शस्त्रक्रिया करण्यात येत आहे. यातून अनेकांचे प्राण वाचले. गरजूंना मदत झाली. त्यामुळे संत अच्युत महाराजांना अभिप्रेत असलेली सेवा घडली आहे. या रुग्णालयाचा तळागाळातील नागरिकांना लाभ होणार आहे. येत्या काळात फुफ्फुस आणि हृदय प्रत्यारोपण आदींच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्णालयाने पुढाकार घ्यावा. रुग्णालयाच्या विकासाचे ध्येय ठरविण्यात यावे. तसेच येत्या काळातही रुग्णालयाने निस्वार्थी भावनेने कार्य करावे, असे आवाहन केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी (दि.22)केले.




गडकरी यांच्या हस्ते श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलच्या नवीन इमारत आणि कार्डीयाक कॅथलॅबचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, दादाराव केचे, सुलभा खोडके, प्रताप अडसड, उमेश यावलकर, केवलराम काळे, सुमित वानखेडे, राजेश वानखेडे, प्रवीण तायडे, प्रवीण पोटे, सचिन देव महाराज आदी उपस्थित होते.

गडकरी यांनी शारदा उद्योग मंदिराला भेट दिली. महिला उद्योगाबद्दल मत व्यक्त करताना त्यांनी उद्योगात महिलांनी पुढे येण्याची गरज असल्याचे सांगीतले. यासाठी महिलांनी कौशल्य आत्मसात करावे. दर्जेदार सेवा दिल्यास त्यातून उत्तम उत्पन्न मिळू शकेल,असे मत त्यांनी व्यक्त केले. गडकरी यांनी पंचवटी येथील डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळा आणि शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. दरम्यान बेलोरा विमानतळ येथे गडकरी यांचे आगमन झाले. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार उमेश यावलकर, प्रविण पोटे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे आदी उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे 'प्रमिला गणेश ठाकरे' यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन मौजे सालोड, ग्रामपंच्यायत मालमत्ता क्रं. 412. ता. नांदगाव खंडेश्वर जिल्हा. अमरावती.

**चर्तुः सीमाः** पूर्व– शंकरराव यांचे घर उत्तर– वाघाडे
पश्चिम– वाघाडे दक्षिण– रस्ता

सदर मिळकत नामे 'प्रमिला गणेश ठाकरे' यांना ग्रामपंच्यायत सालोड यांचा तपशील आणि गाव नमूना 8 नुसार त्यांच्या मालकीची आहे. तसेच वरील वर्णनाची नमूद मालमत्ता ही वडीलोपार्जित आहे. त्यानंतर त्यांनी "PIRAMAL CAPITAL & HOUSING FINANCE LTD. BR AMRAVATI. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केलेला आहे. वरील नमूद मालमत्ता कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी/पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमत्तेवीषयी शासकीय–नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. नं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 (सात) दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

**आपला**
**ADVOCATE**
**रवींद्र रू. वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती**
**मो. नं. 9823698745**